Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

Received: 21/July/2023 IJRAW: 2023; 2(8):202-203 Accepted: 27/August/2023

# ग्रंथालय आधुनिकीकरणातील व्यवस्थापकीय तंत्रे

***[1]राहुल पितांबर जाधव और [2]डॉ. योगिनी धाकड**

*[1]संशोधक विद्यार्थी, कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, महाराष्ट्र, भारत

[2]संशोधन मार्गदर्शक, आर. सी.पटेल कॉलेज ऑफ एज्यूकेशन, शिरपूर. जि. धुळे, महाराष्ट्र, भारत

**सारांश**

मानवी जीवनामध्ये संप्रेषनास फार महत्त्व आहे. मनुष्य त्याचे ज्ञान अनुभव भावना अपेक्षा संप्रेषणाद्वारेच करत असतो. तिला हावभाव हात वारे आवाज इत्यादी मार्गाने मनुष्य संप्रेषण करत होता. लेखन कलेचा शोध लागला आणि संप्रेषणासाठी मनुष्य मातीच्या विटा दगड झाडाची साल पाने इत्यादींचा वापर करू लागला. कागद आणि मुद्रण तंत्राच्या शोधा नंतर मात्र संप्रेषण क्षेत्रात मोठीच क्रांती झाली. किती ज्ञान सहजपणे मुद्रित करून त्याचे जतन आणि संप्रेषण करणे सहज सुलभ झाले. अनेकांच्या अनेक प्रती छापने सहज शक्य झाले. संगणक युगामध्ये माहितीआणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आले आहेत. एवढेच नाही तर या पुढील काळामध्ये आणखी व्यापक परिणाम करणारे बदल घडून येणार आहेत यात शंकाच नाही. संगणक आणि संप्रेषण तंत्रज्ञानातील विकासामुळे माहिती दूरच्या ठिकाणी वेगाने पाठविणे शक्य होत आहे. 24 तास उपलब्ध होत आहे. म्हणजे माहिती तंत्रज्ञानातील विकासामुळे माहिती बहुमाध्यमे(Multimedia) काही उपलब्ध होत आहे. वाचक ग्रंथालीन सेवक व सेवा तसेच वाचन साहित्य इत्यादी सर्वच ग्रंथालयीन घटकांवर तंत्रज्ञानातील विकासाचे परिणाम होत आहेत. ग्रंथालय सुद्धा त्यांच्यामध्ये आधुनिकता आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा वाढता वापर करत आहेत. ज्याप्रमाणे तंत्रज्ञानाच्या वापरातून ग्रंथालयाचे आधुनिकीकरण शक्य आहे त्याचप्रमाणे व्यवस्थापकीय तत्वे आणि तंत्र यांच्या उपयोजनाद्वारेही ग्रंथालयांचे आधुनिकीकरण शक्य आहे

**मूल शब्द:** ग्रंथालय, आधुनिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञाना

## प्रस्तावना

### ग्रंथालय बदलते पैलू

तंत्रज्ञान संशोधक नाविन्याच्या ध्यास सृजनशीलता इत्यादीमुळे ग्रंथालयाच्या सर्वच पैलूंमध्ये अमलाग्रस्तांना दिसत आहेत ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि त्याचा अपेक्षित असा वेग साधण्यासाठी ग्रंथालयांचे बदलते पैलू जाणून घेणे उपयुक्त ठरेल.

1. **वाचन साहित्यातील बदल:** विसाव्या शतकापर्यंत बहुतांश वाचन साहित्य वेगाने वाढत आहेत रेफरन्स सोर्सेस हे वाचन साहित्याचे प्रकार आता उदयास आले आहेत. नाहीतर बहुतांशी इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य हे इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करण्यात येत आहे. स्वरूपातील वाचन साहित्यामुळे ग्रंथालयासंबंधीच्या अनेक बाबींमध्ये बदल होणे शक्य झाले आहे.
   अ) इलेक्ट्रॉनिक वचन साहित्य संग्रामासाठी खूप कमी जागा लागते संगणक सर्वर सीडी एवढ्या पुरती जागा लागते.
   आ) वाचन साहित्य कुठूनही शोधून काढता येते म्हणजेच वाचक वृंदावल्यापासून किती अंतरावर असला तरी त्याला वाचन साहित्य मिळवण्यासाठी कशाचीही गरज किंवा अडचण निर्माण होत नाही.
   इ) साहित्य ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे सोमवार ते शनिवार सकाळी दहा ते सहा अशी ग्रंथालय कामगाराची वेळ ही संकल्पना मुळीच निघत आहे आता ग्रंथालय 24 तास आठवडाभर ऑनलाईन उपलब्ध असतात.
2. **मोफत साहित्याची उपलब्धता:** निर्मितीचा आणि वाहतुकीचा खर्च विचारात घेता मुद्रित वाचन साहित्य मोफत उपलब्ध करणे जवळपास अशक्य होते परंतु इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य निर्माण करण्यासाठी तसेच ते ऑनलाईन उपलब्ध करण्यासाठी मुदत वाचन साहित्य एवढा खर्च येत नाही शिवाय तंत्रज्ञानातील विकासामुळे इलेक्ट्रॉनिक तसेच ऑनलाईन बाबी दिवसेंदिवसस्वस्त होत आहेत याशिवाय लोककल्याणाची परंपराची भावना समाजामध्ये दिवसेंदिवस अधिक दृढ होत आहे यातूनच मोफत वाचन साहित्याची चळवळ उभी राहिली आहे ही चळवळ ओपन एक्सप्रेस या नावाने संबोधली जाते या चळवळीच्या माध्यमातून आज हजारो ई-जर्नल्स मोफत उपलब्ध करण्यात आली आहेत यातील जर्नल ची संख्या सातत्याने वाढत आहेत तसेच हजारो ई-बुकसही मोफत उपलब्ध करण्यात आले आहेत.
3. **वाचकांकडून माहिती तंत्रज्ञानाचा होत जाणारा वाढता वापर:** संगणक, लॅपटॉप, आयपॅड, स्मार्टफोन्स, वाय-फाय, मोबाईल, कम्प्युटिंग ई लर्निंग यांच्यासारख्या तंत्रज्ञानाचे आणि तंत्रज्ञान आधारित सुविधांचा समाजातील उपयोग वाढत आहे, त्यामुळे वाचकांना वाचन साहित्य मिळवण्यासाठी ग्रंथालयाचाच वापर केला पाहिजे अशी आवश्यकता भासत नाही किंवा ही

साधने आणि सुविधा ग्रंथालयास पर्याय आहेत असा आभास तरी तूर्त निर्माण झाला आहे मात्र यात साधन सुविधांचा वापर करून वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करू शकतो.

## नवीन तंत्रज्ञानाच्या वापरातून आधुनिकीकरण

शतकातील नवनवीन शोधामुळे अनेक नवीन उपकरणे व साधने निर्माण होऊ लागली आहेत त्यातून उद्योगांचे कारखान्यांचे आधुनिकीकरण वेगाने होऊ लागले आहे या नवीन उपकरणांच्या वापरातून पुढे शेती व्यवसाय शिक्षण वाहतुकीची साधने दळणवळणाची साधने यांची यादी करून होऊ लागले आहे ग्रंथालयाने सुद्धा सुरुवातीला टाईपराईटर झेरॉक्स मायक्रोफिल्मिंग इत्यादी यंत्रांच्या वापराद्वारे आधुनिकीकरणास सुरुवात केली आहे कलम दराने संगणकाच्या वापरामुळे ग्रंथालयाचे आधुनिकीकरण वेगाने होत आहे आता संग्रहाता बरोबरच इंटरनेट इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य बारकोड आरएफ आयडी व इतर आधुनिक साधनांतरी ग्रंथालयाचे आधुनिकीकरण ही वेगाने वाढत आहे आणि दिशाही योग्य आहे.

व्यवस्थापकीय तत्वे आणि तंत्रज्ञानाच्या वापरातून आधुनिकीकरण

आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून आधुनिकीकरण शक्य होते असे नाही आधुनिक व्यवस्थापकीय तत्वे आणि तंत्र यांच्या उपयोजनाद्वारे ही ग्रंथालयाची  आधुनिकीकरण शक्य आहे. आपल्याला माहीतच आहे की आधुनिकीकरण ही अचूक कार्य करण्याची विचारसरणी आहे गुणवत्ता पूर्ण वस्तू आणि सेवा निर्मितीची विचारसरणी आहे अनेक उद्योग व्यवसायांनी व्यवस्थापकीय तत्वे आणि तंत्रज्ञानाच्या वापराने त्यांची आधुनिकीकरणसाध्य केले आहे.

## व्यवस्थापनाचे तत्वे आणि तंत्र

व्यवस्थापन ज्ञान शाखा अनेक तत्वे आणि तंत्रांनी समृद्ध आहे शिवाय नवनवीन तत्वे आणि तंत्रांची त्यामध्ये सातत्याने भर पडत आहे काही प्रस्तावित तत्वे आणि तंत्रे पुढीलप्रमाणे आहेत विपणनाची तत्वे जशी मार्केट मिक्स

- मूल्यमापनाची तत्वे जशी मूल्य नफा विश्लेषण मूल्य परिणामकारक विश्लेषण.
- तंत्रे जशी सकल गुणवत्ता व्यवस्थापन सिक्स सिग्मा बुद्धिमंथन इत्यादी.
- ग्रंथालय प्रतिनिधी ग्रंथालय आधुनिकीकरणाचा आणखी एक मार्ग.

ग्रंथालय प्रतिनिधींची नियुक्ती करणे हा उपभोक्त्यांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्याचा एक नाविन्यपूर्ण मार्ग आहे. ही संकल्पना मुळात वैद्यकीय प्रतिनिधी या संकल्पनेवर आधारित आहे. वैद्यकीय प्रतिनिधी नवीन नवीन औषधे त्यातील घटक त्यांचे उपयोग परिणाम इत्यादी डॉक्टरांना माहिती देतो व आपल्या विषयासाठी जास्तीत जास्त मागणी यावी यासाठी.

सर्वांनी ग्रंथालय नियमितपणे नवनवीन वाचन साहित्य उपस्थित करत असतात या सर्वच वाचन साहित्याची तेथील विषयांची या विषयाची वाचकांना माहिती असते तसे नाही तसेच ग्रंथालय त्यांना प्रत्येक वेळेस ते निश्चित असे पुस्तक हवे असे ठरवून येतील असे नाही. त्यामुळे आपला वाचक वर्ग अंदाजाने स्वतः वाचण्यासाठी वाचन साहित्य निवडतो अर्थात वाचण्यासाठी ग्रंथ निवडण्यासाठी वाचक काही प्रमाणात त्याचे मित्र आणि ग्रंथ परीक्षणावरही अवलंबून राहतो परंतु विशिष्ट हेतूसाठी निश्चित असे कोणतेही पुस्तक वाचावे हे मात्र त्याला क्वचितच माहिती असते. परिस्थितीत जर आपल्याकडील ग्रंथालय प्रतिनिधींनी नवीन वाचन साहित्याचा अभ्यास केला त्यातील विषय असे माहिती करून घेतला आणि स्वतःकडे जाऊन वाचकास पुस्तकांबद्दल माहितगार बनवले तर वाचक त्याचे स्वागतच करतील. विशिष्ट पुस्तक वाचकांनी का वाचावे ते त्याला कसे उपयुक्त आहे याचा त्याला काय फायदा होईल इत्यादी माहिती ग्रंथालय प्रतिनिधींनी वाचकांना पुरवावी. त्यामुळे वाचकाला हवे तेच वाचनसाहित्य मिळेल त्याचा वाचन साहित्य निवडणुकीत वेळ वाचेल ग्रंथांचा वापर वाढेल. ग्रंथालय प्रतिनिधी हे बालवाचकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. बाळू वाचन साहित्य बाबत लहान मुलांना माहिती देऊन त्यांना वाचण्यासाठी प्रवृत्त करतात. महिलांना उपयुक्त सना वाचन साहित्य बाबत माहिती पुरवणारे ग्रंथालय प्रतिनिधी ही हे कार्य चांगल्या पद्धतीने करू शकतील. प्रतिनिधीना त्यांच्या क्षमतेनुसार आणि कौशल्यानुसार मोबदला मिळू शकेल. तिला सर्वजण ग्रंथालयांनी या संकल्पनेच्या अनौपचारिकपणे अवलंब करून त्यानुसार अनुभवानुसार त्यात बदल करणे उपयुक्त ठरेल.

## समारोप

ग्रंथालयांनी आपल्या अस्तित्व टिकवण्यासाठी तसेच वृद्धी विकासासाठी आधुनिकीकरण करणे आहे. आधुनिकीकरणाचे परिणामकारक कार्य करण्याचे गुणोत्तरपूर्वक सेवा देण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. प्रत्येक ग्रंथालयाने आपल्या क्षमतेनुसार आणि स्वरूपानुसार योग्य त्या मार्गाने आधुनिकीकरण करण्याचा ध्यास धरावा. प्रकारच्या व्यवस्थापकीय तंत्राच्या वापर केल्यास ग्रंथालय अधिक आधुनिक होतील अशी खात्री आहे.

## संदर्भ

1. पवार एस. पी. (२००८), ग्रंथालय व माहितीशास्त्र ,पुणे, फडके प्रकाशन.
2. कोन्नूर, सुजाता (२००९), माहिती तंत्रज्ञान, पुणे, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
3. फडके, द.ना. (२००७), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनकीकरण, युनिवर्सल प्रकाशन, पुणे.